**देशोन्नती**
**वाशिम, शुक्रवार, दि.२९ जानेवारी २०२१**

# बजेटमध्ये आरोग्यक्षेत्राची तरतूद वाढवावी

## डॉ. तोगडिया यांची मागणी

देशोन्नती वृत्तसंकलन...

मंगरुळपीर ■ देशातील आरोग्य सेवा ही अतिशय खालच्या दर्जाची असून १ हजार रूग्णांच्या मागे १ बेड व १ डॉक्टर आहे. तसेच, बजेटमध्ये आरोग्य क्षेत्राला योग्य न्याय मिळायला हवा. त्यामुळे सरकारने भविष्यकालिन चिंता ओळखून आरोग्य क्षेत्रावरील बजेट वाढवावे. अशी मागणी विश्व हिंदू परिषदेचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध कॅन्सर तज्ज्ञ डॉ. प्रविण तोगडिया यांनी केली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून ते बोलत होते. ही परिषद आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च



स्तरीय सुधारणा करणे या विषयावर विश्‍वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने संपन्न झाली. या प्रसंगी आरोग्य मंत्री राजेश टोपे, आरोग्य मंत्री नाबा किशोर दास, आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत, माजी केंद्रीय मंत्री पद्मश्री डॉ. सी.पी. ठाकूर, खा. भारती पवार, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. याप्रसंगी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.एन.टी. राव, प्र कुलगुरू प्रा.डॉ. मिलिंद पांडे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस. कुचेकर, प्रमुख डॉ. अक्षय बाहेती व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक रविंद्रनाथ पाटील हे उपस्थित होते. राजेश टोपे म्हणाले, कोविडच्या काळात सरकारने महत्वाची भूमिका पार पाडून वैद्यकीय क्षेत्राशी निगडी सर्व साधनांच्या सेवेची किंमत कमी करून नागरिकांना दिलासा दिला. नबा किशोर दास म्हणाले, कोविड १९ च्या काळात संपूर्ण जग जेव्हा त्रस्त होते तेव्हा भारताने चांगली भूमिका बजावली होती. डॉ. दीपक सावंत म्हणाले, देशात आज ही डॉक्टर आणि पॅरामेडिकलच्या मनुष्यबळांची संख्या खूप कमी आहे. डॉ. विजय भटकर म्हणाले, सर्वांना मानवतेचे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने म्हणाले, आरोग्य सेवेसाठी बजेटमध्ये भरीव तरतूद करणे गरजेचे आहे. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, वैद्यकीय शिक्षणातील वाढता खर्च लक्षता घेता विद्यार्थी संख्या वाढविण्याची गरज आहे. राहुल कराड म्हणाले, कालानुरूप वैद्यकीय क्षेत्रात होणारे बदल तसेच यात येणाऱ्या नवीन पॉलिसी संदर्भात या पार्लमेंटमध्ये चर्चा करण्यात आली. पद्मश्री डॉ.सी.पी. ठाकूर आणि डॉ. भारती पवार यांनी वर्तमानकाळातील वैद्यकीय परिस्थितीवर आपले विचार मांडले. डॉ. एन.टी.राव यांनी पार्लमेंटसंदर्भात विस्तृत माहिती दिली. डॉ. अक्षय बाहेती यांनी स्वागतपर भाषण केले.प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.बी.एस. कुचेकर यांनी आभार मानले.(ता.प्र.)

> डॉ. प्रविण तोगडिया म्हणाले, आरोग्याची चांगली सुविधा मिळणे हा देशातील प्रत्येक नागरिकाचा मुलभूत अधिकार असून ती देणे सरकारची जबाबदारी आहे. देशात प्राथमिक आरोग्य केंद्र आणि कम्युनिटी हेल्थ सेंटरची संख्या २५ हजारपेक्षा अधिक आहे. परंतू या ठिकाणी २ हजार ही डॉक्टर उपलब्ध नाही.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**